# रे.दि.मु.नं. ६७/२०२० मध्ये निशाणी क्र. २९ खालील आदेश

प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रस्तुत दाव्याचे कामी विहित प्रक्रियेने हजर झाले आहेत. परंतु, हजर होऊनही त्यांनी विहित मुदतीत कैफियत दाखल केले नाही. म्हणून प्रतिवादी क्र. २ व ३ याच्याविरुद्ध दिनांक २०/०६/२०२३ रोजीचे निशाणी १ खालील आदेशान्वये दावा विनाकैफियत चालविणेचा आदेश पारित करण्यात आलेला आहे.

२ प्रतिवादी क्र. २ व ३ ने सदरचा अर्ज दाखल करुन त्यांच्या विरुद्ध झालेला विनाकैफियतचा आदेश बाजूला सारुन कैफियत दाखल करण्याची परवाणगी मिळावी याकरिता केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ चे असे कथन आहे की, त्यांना दावे कामी कागदप्रत्र मिळविण्यात तसेच गावातील काही नातेवाईकांच्याकडे वादीने काही थोडे फार घेवून तडजोड करु असा निरोप मिळाल्याने व प्रकरण लोकन्यायालयात ठेवल्याने प्रतिवादी क्र. २ व ३ हे वादीची वाट पाहत राहिले. परंतु वादी लोकांकडून दिलेल्या निरोपाप्रमाणे वागले नाहीत. त्यामुळे वेळेत वकिलांना कागदपत्रे व माहिती देवून दाव्यास कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. वादीने दिलेल्या भूलथापावर अवंलबून राहिल्याने प्रतिवादी क्र. २ व ३ विहित मुदतीत कैफियत दाखल करु न शकल्याने त्याच्या विरुद्ध दिनांक २०/०६/२०२३ रोजी विनाकैफियत दावा चालवण्याचा आदेश पारित झाला. प्रतिवादी क्र. २ व ३ ने मुद्दामहून दाव्यास कैफियत विहित मुदतीत दाखल केली नाही असे नाही. दाव्यास कैफियत दाखल करण्यास विलंब होण्यास वादी कारणीभूत आहे. करिता दिनांक २०/०६/२०२३ रोजीचा आदेश बाजूला सारुन कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवाणगी देण्यात यावी असे प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे कथन आहे.

३ वादीने निशाणी २३ कडे आपले म्हणणे दाखल केले आहे. वादीचे कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. २ व ३ यांना दिनांक १५/०१/२०२३ रोजी दाव्याची नोटीस बजावणी झालेवर

वेळोवेळी मुदतीचे अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र. २ व ३ ने संधी मिळवली आहे. त्यामुळे वादीचा तुर्तास ताकिदीचा अर्ज प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास किती दिवसांचा विलंब झाला हे सुद्धा नमुद केलेले नाही. प्रतिवादी क्र. २ व ३ ने प्रस्तुत अर्जात विलंबाबाबत दिवसागणीत कागदोपत्री पुरावा दिलेला नसल्याने अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीने केलेली आहे. वादीने पर्यायाने प्रतिवादी क्र. २ व ३ चा अर्ज मंजुर केल्यास रुपये ५,०००/– इतका दंड प्रतिवादी क्र. २ व ३ वर बसवावा अशी विनंती केलेली आहे.

४ दाव्याचे, कागदपत्राचे, अर्जाचे व वादीने अर्जावर दिलेले म्हणणे यांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा सरसनिरस मानाने तुटक वाटप होवून पृथक कब्जा मिळेणेसाठी व निरंतर ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. वादीचे दाव्यात कथन असे आहे की, दावा कलम १ मध्ये नमूद मिळकती वडीलोपार्जित मिळकती असून त्यामध्ये वादी व प्रतिवादीचा अविभक्त हिस्सा व अधिकार आहे. दावा वडीलोपार्जित मिळकतीचा वाटपाचा असल्याने प्रतिवादी क्र. २ व ३ चे वाद मिळकतीमध्ये हितसंबंध व हक्क आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. २ व ३ ला दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता त्यांची बाजू मांडण्याची व बचाव सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. हे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ व ३ ने दाव्यात हजर होवूनही विहित मुदतीत दाव्यास कैफियत व म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे दावा प्रलंबित राहिलेला आहे व दाव्यात कोणतीही प्रगती झालेली नाही. दावा सरस निरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा होऊन मिळण्याकरिता व निरंतर ताकिदीसाठी दाखल करण्यात आला आहे. स्थावर मिळकतीतील पक्षकारांचे हक्क व हितसंबंध या अनुषंगाने सदरचा दावा आहे. अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी, वाद विषयांची अनेकता टाळण्यासाठी तसेच प्रकरणातील गुंतागुंत टाळण्यासाठी प्रतिवादी क्र. २ व ३ यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवाणगी देणे न्यायाचे व गरजेचे आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून माझे असे मत आहे की, प्रतिवादी क्र. २ व ३ चा सदर अर्ज मंजूर

होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१ प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. २९ वादीला प्रतिवादी क्र. २ व ३ ने एकूण खर्चाची रक्कम रू.२००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहेत व दिनांक २०/०६/२०२३ रोजीचे विनाकैफियत आदेश बाजूला सारुन प्रतिवादी क्र. २ व ३ ला कैफियत व म्हणणे सादर करण्यास परवाणगी देण्यात येते.

२ वर नमूद केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर प्रतिवादी क्र. २ व ३ ची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2024.11.27 17:27:38 +0530

स्थळ:– जत
दि. २७/११/२०२४

(पी. सी. बछले)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत